www.rajdand.com
सातारा शनिवार
१०. २. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

## महत्त्वाचे

### ससून रुणालयातील आग आटोक्यात

**पुणे :** दि. ०९.२.२०२४ रोजी रात्री ०८.१० वाजता ससून रुणालयात आग लागल्याची वर्दि मिळताच अग्निशमन मुख्यालयातून एक व नायडू अग्निशमन केंद्र येथून एक अशी दोन अग्निशमन वाहने रवाना करण्यात आली होती. घटनास्थळी पोहोचताच जवानांनी पाहिले की, रुणालयात मोठ्या प्रमाणात धुर निर्माण झाला होता. ससून रुणालयातील नवीन इमारतीत दहाव्या मजल्यावर आग असल्याचे समजताच जवानांनी वर धाव घेतली असता, तिथे वार्डमधील शौचालयामागे असणाऱ्या डक्टमधे आग लागून मोठ्या प्रमाणात धुर निर्माण झाला होता. रुणालयातील सुरक्षारक्षक यांनी तातडीने अग्निरोधक उपकरण वापरुन आग आटोक्यात आणल्याने मोठा धोका टळला होता. वार्डमधील रुग्णदेखील सुखरुप आहेत. आग पुर्ण विझली असून पुर्ण धोका दुर झाला असून जखमी वा जिवितहानी नाही. आगीचे कारण अंदाजे शौचालयात कोणी धुम्रपान केल्याने आग लागली असावी. अग्निशमन दल जनजागृतीपर घेत असलेले मॉकड्रील याचा मोठ्या स्वरूपात उपयोग होतो हे या घटनेमुळे समजते.

कात्रज कोंढवा रस्त्यासाठी २०० कोटी मंजूर आता आदेशाची प्रतिक्षा

कात्रज-कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणासाठी आवश्यक जागा ताब्यात घेण्यासाठी गेल्या वर्षभरापासून राज्य सरकारकडून २०० कोटी रुपये दिले जाणार असल्याची फक्त चर्चा सुरु होती. अखेर ही रक्कम नुकत्याच झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत मंजूर झाली आहे.

### कात्रज कोंढवा रस्त्यासाठी २०० कोटी मंजूर

**पुणे :** कात्रज-कोंढवा रस्त्याच्या रुंदीकरणासाठी आवश्यक जागा ताब्यात घेण्यासाठी गेल्या वर्षभरापासून राज्य सरकारकडून २०० कोटी रुपये दिले जाणार असल्याची फक्त चर्चा सुरु होती. अखेर ही रक्कम नुकत्याच झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीत मंजूर झाली आहे. आता शासन आदेश काढल्यानंतर ही रक्कम महापालिकेच्या बँक खात्यात जमा होणार आहे. त्यामुळे रखडलेल्या भूसंपादनाच्या कामाला गती येण्याची शक्यता आहे.

# विरोधकांकडून सरकारची बदनामी करण्याचा प्रयत्न

## अजित पवारांचे गोळीबाराच्या घटनांवर स्पष्टीकरण



**तीन्ही गुन्हे लायसन्स रिवॉल्व्हरने झाल्याबद्दल विचारले असाता अजित पवार म्हणाले की, रिवॉल्व्हर देताना कलेक्टर, एसपीकडून तपासून दिलं जातं. कोणी लोकप्रतिनिधींना बाहेर फिरावं लागतं म्हणून रिवॉल्व्हर दिलं जातं. ते दिल्यानंतर त्यांनीच असा गोळीबार केला तर एसपी, कलेक्टर यांना दोष देऊन उपयोग नाही असेही अजित पवार म्हणाले.**

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून राज्यात होत असलेल्या गोळीबाराच्या घटनांमुळे एकच खळबळ उडाली आहे. उल्हासनगर येथे भाजप आमदार गणपत गायकवाड यांनी शिंदे गटातील नेत्यावर गोळीबार केल्याचा प्रकार समोर आला होता. यानंतर काल ठाकरे गटाचे नेते अभिषेक घोसाळकर यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. यानंतर विरोधकांनीकडून राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यांच्या राजीनाम्याची देखील मागणी केली जात आहे. यादरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली.

अजित पवार म्हणाले की, ही घटना अतिशय चुकीची घडली आहे. पण आपण जर पहिलं तर व्हिडीओमध्ये दोघे गप्पा मारत आहेत. दोघांचं संभाषण स्पष्ट आहे. ते ऐकल्यावर दोघांचे मित्रत्वाचे संबंध असून चांगली ओळख असल्याचं दिसत आहे. याचा व्यवस्थित तपास झाला पाहिजे. उठताना पण घोसाळकर बोलत आहेत. माणुसकीला काळिमा फासणारी ही घटना आहे, अशा घटना कुठेच होता कामा नयेत.

पण बाहेर सगळी पोलीस यंत्रणा असेल, आत दोघे त्यांच्या धंदा-पाण्याच्या गोष्टी अतिशय आपलेपणाने करत आहेत. एकजण हाफ पँन्ट आणि टी शर्टमध्ये दिसतोय. त्यानंतर अशी गोष्ट घडली. याचा तपास केला गेला पाहिजे, असे अजित पवार म्हणाले.

विरोधक मोठ्या प्रमाणावर सरकारची बदनामी करण्याचा प्रयत्न करत आहेत. गृहमंत्र्यांचा राजीनामा मागण्यासाठी त्यांना निमीत्त मिळालं आहे. आम्ही नाकारत नाही, पण यामागची पार्श्वभूमी तपासली पाहिजे. दोघं बोलत असताना सिक्युरिटीला बाहेर थांबायला सांगितल्यानंतर तो बाहेरच थांबणार. झालेली घटना दुर्दैवी आहे. मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांनी याबद्दल वर्षा बंगल्यावर चर्चा देखील केली आहे, मी सीपी आणि एसपींना याविषयी बोलणार आहे, कुणा गुंडाची मस्ती सुरू असेल तर पोलिसी खाक्या दाखववा लागेल असं त्यांना सांगितलं आहे असेही अजित पवार म्हणाले.

राज्यातील गोळीबाराच्या घटनांवर बोलताना अजित पवार म्हणाले की, पहिली घटना मुळशी येथे घडली ते गुंड प्रवृत्तीचेच होते. गुंडानीच गुंडाचा काटा काढला. उल्हासनगरच्या घटनेबाबत जरी ते सत्ताधारी पक्षाचे आमदार असले तरी कारवाई तात्काळ करण्यात आली. त्यांच्यातील गोळीबार जमीनीच्या व्यवहारातून झालं आहे. ते तर निवांत पोलीस स्टेशनला बसले होते. त्या घटनेत पोलिसांचं कौतुक केलं पाहिजे. गोळ्यांचा आवाज आल्यानंतर दोन पोलीस आतमध्ये आले आणि त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. जखमींना रुणालयात नेलं. सध्या ते धोक्याबाहेर आहेत. पण पोलीसांनी सत्ताधारी पक्षाच्या आमदारास लगेच अटक केली आणि आता पुढील कारवाई केली जात आहे, असे अजित पवार म्हणाले.

तीन्ही वेगवेगळ्या घटना पाहिल्या तर एक जमीनीच्या वादातून घडल्याचे दिसते , दुसरी कशातून आहे ते निष्पन्न होईल. तिसरी गँगवॉरमधून झाली आहे असेही अजित पवारांनी स्पष्ट केलं.



## सरकार बरखास्त करुन राष्ट्रपती राजवट लागू करा ; नाना पटोलेंची मागणी

**मुंबई :** काल मुंबईतील दहीसर येथील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांची गोळ्या झाडून हत्या झाली. मॉरिस नोरोन्हा या व्यक्तीने हा गोळीबार केली आणि स्वत:वरही गोळ्या झाडून घेतल्या. या घटनेनंतर आता राजकीय वर्तुळातून आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. काँग्रेसप्रदेशाध्यक्षनाना पटोलेयांनी राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणी केली आहे.

गेल्या काही दिवसापूर्वी उल्हासनगर येथील आमदार गणपत गायकवाड यांनी शिंदे गटाचे नेते महेश गायकवाड यांच्यावर गोळबार केला होता. यानंतर आता काल ठाकरे गटाचे नेते अभिषेक घोसाळकर यांच्यावर गोळीबार झाला. तर दुसरीकडे पुण्यातील काही गुंडांचे सरकारमधील संबंध असल्याचा आरोप सुरू आहे. यावर आता राज्याक राष्ट्रपती राजवट लागू करण्याची मागणी होत आहे. अभिषेक घोसाळकरांवरच पिस्तुलीतील गोळ्या संपवल्या, मॉरिसने स्वत:वर कुठून झाडल्या ?महाराष्ट्रात कायद्याचे तीन तेरा वाजले आहेत, गुडांना कसलीच भिती राहिलेली नाही. कल्याणमध्ये पोलीस स्टेशनमध्ये गोळीबार, जळगाव, यवतमाळमधील गोळीबाराच्या घटनानंतर आता मुंबईत माजी नगरसेवकाची हत्या अशा घटना वाढत आहेत ही महाराष्ट्रासाठी अत्यंत गंभीर व चिंतेची बाब आहे. मुख्यमंत्र्यांचा 'वर्षा' बंगला तसेच मंत्रालयात गुडांचा वावर बिनदक्कितपणे सुरु आहे.



## जूनपासून मुलींना मोफत उच्च शिक्षण मिळणार

### मेडिकल, इंजिनिअरिंगसह ६०० अभ्यासक्रम

**मुंबई :** मुलींच्या शिक्षणासंदर्भात महत्वाची बातमी य़ेत आहे. येत्या जूनपासून राज्यात ज्या मुलींच्या पालकांचे आठ लाखांपेक्षा कमी उत्पन्न आहे त्यांना मेडिकल असो की इंजिनिअरिंग जवळपास ६०० अभ्यासक्रमांचे शिक्षण मोफत दिले जाणार आहे. राज्याचे उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी ही घोषणा केली आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पाटील यांनी ही घोषणा केली आहे. या योजनेत ६०० वेगवेगळे अभ्यासक्रम घेण्यात आले आहेत. इंजिनिअरिंग, मेडिकल सारख्या अभ्यासक्रमांना पालकांचे लाखो रुपये खर्च होतात. मेडिकलसाठी तर करोड रुपये लागतात. यामुळे सामान्य घरातील मुले शिकू शकत नव्हती. त्यांच्या आता शिक्षणाची दारे उघडणार आहेत. याचबरोबर चंद्रकांत पाटलांच्या घोषणेनंतर मुलांमध्ये नाराजी पसरली आहे. कार्यक्रम संपल्यानंतर पाटील यांना या मुलांनी अडवत फक्त मुलींनाच मोफत का, या उत्पन्नाखालील मुलांना देखील मोफत करावे अशी मागणी केली. यावेळी पाटील यांनी तुमची ही मागणी आपण मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालेन असे आश्वासन दिले.

# एसटी कर्मचाऱ्यांचे बेमुदत उपोषण

## कामगार संघटनेची एसटी महामंडळाला नोटीस!



**मुंबई :** महागाई भत्याची, घरभाडे भत्याची व वार्षिक वेतनवाढ थकबाकी देण्याबाबत १५ दिवसात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत मान्यताप्राप्त कामगार संघटनेसमवेत बैठक घेऊन निर्णय घेण्याचे मान्य केलेले होते. परंतु ४ महिन्यांचा कालावधी संपूनही अद्याप अशी बैठक झालेली नाही.

त्यामुळे एसटी कामगार संघटने नाराजी व्यक्त करत प्रलंबित मागण्यासाठी पुन्हा एकदा संपाचे हत्यार उपसण्याची घोषणा केली आहे. संघटनेने १३ फेब्रुवारीपासून बेमुदत उपोषणाची नोटीस एसटी महामंडळाला दिली आहे.

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना देय होणारा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वार्षिक वेतनवाढ एसटी कामगारांना त्याच दरानुसार व नियमानुसार लागू करण्याचे कामगार करारानूसार सरकारने मान्य केले आहे. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना ४६ टक्के महागाई भत्ता जूलै २०२३ पासून थकबाकीसह नोव्हेंबर २०२३च्या पगारात देण्यात आला.

मात्र एसटी कर्मचाऱ्यांना हा भत्ता लागू केलेला नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली वित्त, नियोजन मंत्री यांच्या उपस्थितीत उद्योग मंत्री सामंत यांनी १५ दिवसात बैठक घेऊन निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

मात्र आजपर्यंत निर्णय झाला नसल्याने एसटी कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे, असे एसटी कामगार संघटनेचे अध्यक्ष संदीप शिंदे यांनी सांगितले.

या सर्व प्रलंबित आर्थिक मागण्यांच्या सोडवणूकीसाठी संघटनेने १३ फेब्रुवारी, २०२४ पासून बेमुदत उपोषण सुरू करण्याची उपोषण नोटीस एसटी महामंडळाला १ जानेवारी २०२४ रोजी दिलेली आहे.

सदरच्या उपोषण नोटीसची दखल घेऊन एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी १३ फेब्रुवारी, २०२४ पुर्वी संघटनेसमवेत बैठक घेऊन सदरचे आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी शासन पातळीवर पाठपुरावा केला जाईल असे मान्य केलेले आहे.

जर एसटी कर्मचाऱ्यांची सर्व आर्थिक प्रलंबित मागण्यांची सोडवणूक न झाल्यास संघटना १३ फेब्रुवारी, २०२४ पासून राज्यातील सर्व विभागीय पातळीवर बेमुदत उपोषण सुरू करण्यात येणार आहे, असे शिंदे यांनी स्पष्ट केले आहे.

### "बाळासाहेब ठाकरेंना भारतरत्न द्या" राज ठाकरेंसह राऊतांची मागणी

**मुंबई :** शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांना भारतरत्न देण्याची मागणी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली आहे. शुक्रवारी पंतप्रधानांनी आणखी तीन दिग्गजांना भारतरत्न देण्याची घोषणा केली आहे. त्यानंतर राज यांनी सोशल मीडियात पोस्ट करुन ही मागणी केली.

**राज ठाकरेंची फेसबुक पोस्ट**

माजी पंतप्रधान स्व. पी.व्ही. नरसिंहराव, स्व. चौधरी चरण सिंग आणि भारतीय हरित क्रांतीचे जनक एस.स्वामिनाथन ह्यांना भारतरत्न सन्मान घोषित करण्यात आला. ह्या यादीतले एस.स्वामिनाथन ह्यांचं अवघ्या काही महिन्यांपूर्वी निधन झालं. इतकी अफाट कामगिरी करणाऱ्या शास्त्रज्ञाला त्यांच्या हयातीत हा बहुमान मिळायला हवा होता. असो.

राज ठाकरे पुढे म्हणतात, बाकी पी.व्ही नरसिंहराव आणि चौधरी चरण सिंग ह्यांना आणि काही वर्षांपूर्वी प्रणब मुखर्जींना भारतरत्न सन्मान घोषित करून, केंद्रातील भारतीय जनता पक्ष प्रणित सरकारने राजकीय औदार्य दाखवलंच आहे तर मग हेच औदार्य त्यांनी बाळासाहेबांना देखील भारतरत्न घोषित करून दाखवायलाच हवं.

# बरेलीत मोठा गोंधळ अन् दगडफेक

## तौकीर रझांच्या आव्हानानंतर हजारो समर्थक रस्त्यावर उतरले



**बरेली :** बरेलीत मौलाना तौकीर रझा खान यांच्या 'जेल भरो'च्या आवाहनानंतर शहरातील परिस्थिती बिघडली आहे. शुक्रवारच्या नमाजानंतर हजारो समर्थक रस्त्यावर उतरले. नमाजनंतर तौकीर रझा यांनी लोकांना संबोधित केले आणि अटक करुन घेण्यासाठी इस्लामिया ग्राउंडकडे जाण्यास सुरुवात केली. यावेळीपोलिसांनीत्यांच्या समर्थकांना वाटेत अडवण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे समर्थक संतप्त झाले आणि त्यांनी बॅरिकेड तोडले. यानंतर शाहमतगंज परिसरात दगडफेक करण्यात आली.-ऊ्नएठढखडएचएछढ-वी

लूमिळालेल्या माहितीनुसार, बारादरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शहामत गंज परिसरात दगडफेक झाली असून यामध्ये काही लोक जखमी झाले आहेत. या प्रकरणाची चौकशी करत असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. आरोपींविरुद्ध एफआरआय दाखल करण्यात येणार आहे. सध्या घटनास्थळी मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

**नेमकं काय प्रकरण आहे?**

मौलाना तौकीर रझाने हल्दवानी हिंसाचार आणि ज्ञानवापीवरील न्यायालयाच्या निर्णयाविरोधात जेलभरोची घोषणा केली होती. शुक्रवारची नमाज अदा केल्यानंतर ते आपल्या समर्थकांसह रस्त्यावर उतरले असतापोलिसांनीत्यांना अडवले. मात्र, मुस्लिम समाजातील लोक मोठ्या संख्येने रस्त्यावर जमा झाले आणि त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

यावेळी तौकीर रझा म्हणाले की, देशात द्वेषाचे वातावरण निर्माण झाले आहे. आमच्या मशिदी आणि घरांवर बुलडोझर चालवला जातोय. अशा परिस्थितीत आपली प्रार्थनास्थळे वाचवणे, ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. संविधानाने दिलेल्या अधिकारांसह शांततेने आपला निषेध नोंदवू. मात्र, यावेळी त्यांनी हल्द्वानी हिंसाचारावर सीएम धामी यांच्यावर वादग्रस्त वक्तव्य केले. तौकीर रझा म्हणाले- तुम्ही आमच्या घरावर बुलडोझर चालवलात तर आम्ही गप्प बसू का? आता कोणताही बुलडोझर खपवून घेतला जाणार नाही. सर्वोच्च न्यायालय दखल घेत नसेल, तर आम्ही आमचे संरक्षण करू, कायद्याने आम्हाला अधिकार दिला आहे. कोणी आपल्यावर हल्ला केला, तर आपण त्याला मारले पाहिजे. यावेळी रझा यांनी पीएम मोदी आणिउत्तराखंडचेमुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांच्यावरही आक्षेपार्ह टिप्पणी केली आणि अपशब्दही वापरले.सध्या बरेलीचे वातावरण चांगलेच तापले आहे. पोलीस प्रशासन अलर्टवर आहे. इस्लामिया मैदानावर १००० हून अधिक पोलीस तैनात करण्यात आले आहेत. एसपी, डीएसपी यांच्यासह सर्व अधिकारी उपस्थित आहेत. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी पीएसी आणि आरएएफलाही तैनात करण्यात आले आहे. अतिक्रमण हटाओ मोहिमेअंतर्गतउत्तराखंडच्याहल्दवानीमध्ये उसळलेल्या हिंसाचारानंतर वातावरण तापले असताना हे सर्व घडत आहे. उत्तराखंड ते यूपीपर्यंत हाय अलर्ट आहे.

# पीककर्ज वितरणात पुणे जिल्ह्याचा विक्रम डिसेंबर अखेर ५ हजार ७६३ कोटींचे पीक कर्ज वाटप

**रांजणी :** पुणे जिल्ह्यात पीककर्ज वाटपामध्ये सलग तिसऱ्या वर्षी उच्चांक गाठत २०२३ - २४ यावर ३१ डिसेंबर अखेर ५ हजार ७६३ कोटी रुपये इतके कर्ज वाटप झाले आहे . तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्या पुढाकाराने सर्व बँकांना पीक कर्जासाठी प्रोत्साहित करण्यात आले होते .

गेल्या वर्षी म्हणजेच सन २०२२ -२३ सालात ५ हजार २० कोटी रुपये तर २०२१ - २२ मध्ये ३ हजार ८९३ कोटी पिककर्ज वाटप जिल्ह्यात झाले होते .यावर्षी पीक कर्जासाठी राबविण्यात आलेल्या अभियानामुळे ३१ डिसेंबर अखेर ५ हजार ७६३ कोटी रुपयांचा टप्पा पार करण्यात आला आहे .

दरम्यान खरीप हंगामातील आणि रब्बी हंगामातील पीक कर्ज वाटपाबाबत वेळोवेळी बँकांची जिल्हा पातळीवर बैठक घेऊन सार्वजनिक क्षेत्रातील राष्ट्रीयकृत बँका खाजगी क्षेत्रातील बँका तसेच पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला जास्तीत जास्त पीक कर्ज वाटपासाठी प्रोत्साहित केले . या सर्व प्रक्रियेत जिल्हा अग्रणी बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्राचे जिल्हा अग्रणी व्यवस्थापक श्रीकांत कारेगावकर यांनी देखील मोलाची भूमिका बजावली आहे .बँक ऑफ महाराष्ट्र पुणे शहर परिमंडळाचे तत्कालीन महाव्यवस्थापक राजेश सिंग आणि सध्याच्या महाव्यवस्थापक अपर्णा जोगळेकर यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले . या कर्ज वाटपात राज्यस्तरावरील बँकर्स कमेटीचे सर्व सदस्य तसेच बँकांची जिल्हा समन्वयक , क्षेत्रीय व्यवस्थापक , जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे देखील मोलाचे सहकार्य लाभले असल्याची माहिती कारेगावकर यांनी दिली .

यावर्षीच्या ५ हजार५०० कोटी रुपये एवढ्या उद्दिष्टापेक्षा २६३ कोटी रुपये अधिक कर्ज वाटप करून उद्दिष्टाच्या १०५ टक्के कामगिरी केली आहे . यामध्ये मच्छ्य व्यवसायासाठी २ कोटी २ लाख रुपये तसेच पशुपालनासाठी १७ कोटी ७६ लाख रुपये कर्ज पुरवठा करण्यात आला आहे . फेब्रुवारी आणि मार्च महिण्यातील आकडेवारी समोर आल्यावर यामध्ये आणखी मोठी भर पडण्याची शक्यता आहे .

बँकांच्या माध्यमातून वेळेत कर्ज मिळाल्यामुळे शेतकरी बांधवांचा शेतीला लागणाऱ्या बी -बियाणे तसेच इतर खर्चांचा प्रश्न वेळेवर सुटला . बँकांनी शेतकऱ्यांना सहकार्य केल्याने बहुतेक शेतकरी खाजगी सावकारांच्या कर्जाच्या जोखडातून मुक्तता होण्यास मदत झाली आहे .बँकांनी शेतकऱ्यांना वेळेत पीक कर्ज वाटप केल्याने शेतकऱ्यांचा आर्थिक प्रश्न सुटण्यास मदत झाली , असे वळती येथील प्रगतशील शेतकरी महादेव भोर यांनी सांगितले .

# दादा, सगळं 'दान' तुमच्याबाजूने पडले तरी... 'मतदान' गृहित धरू नका



अजित पवार यांच्या राष्ट्रवादी गटाला 'घड्याळ' हे चिन्ह मिळाले. पक्षाचे नावही मिळाले. दादा जेव्हा शिंदे-भाजपा सरकारात सामील व्हायचे ठरले, त्याच दिवशी पुढच्या सगळ्या गोष्टी विनातक्रार मान्य होणार आहेत, हे ही ठरलेच होते. पंतप्रधानांनी ज्या दिवशी दादांवर थेट हल्ला केला... त्यानंतर दादागट २४ तासांत आपला पक्ष घेऊन शिंदे-फडणवीस सरकारात सामील झाला. त्याचदिवशी 'दादा म्हणतील, ते-ते मान्य होणार' हे ठरल्यासारखेच होते. तुम्हाला मुख्यमंत्रीही करतील... तुमची ती इच्छाही पुरी होईल. निवडणूक आयोग ही 'स्वायत्त संस्था' असली तरी त्या संस्थेमधील 'स्वा' किती आहे, याची सगळ्यांना कल्पना आहे. त्यामुळे 'घड्याळ' चिन्ह दादा गटाला मिळणे हे ठरल्यात जमा होते. शिंदे गट फुटला तेव्हा शिंदे गटालाच 'धनुष्य-बाण' मिळणार, हेही ठरले होते. शिवसेनेला 'मशाल' चिन्ह दिले गेले. शिंदे मुख्यमंत्री झाल्यापासून गेल्या १६ महिन्यात 'धनुष्यबाण' चिन्ह मिळाले असतानाही, त्यांच्या गटाने एकही निवडणूक लढवलेली नाही. अंधेरीच्या विधानसभा पोट निवडणुकीत शिवसेनेने 'मशाल' या चिन्हावर निवडणूक लढवली आणि जिंकली. शिंदे मुख्यमंत्री असताना ३२ वर्षे भाजपाकडे असलेला कसबा मतदारसंघही भाजपाने गमावला. नागपूरचा पदवीधर मतदारसंघही भाजपाचा अड्डा... अमरावतीचा शिक्षक मतदारसंघही भाजपाच्या प्रभावाखाली... शिंदे मुख्यमंत्री असताना त्या दोन्ही जागा गेल्या... काँग्रेसने जिंकल्या... कसबाही गेले... पिंपरी-चिंचवडला त्यावेळच्या 'राष्ट्रवादीच्या' अजितदादांचा माणूस फोडून फडणवीसांनी मतविभाजन होईल, याची काळजी घेतली. फोडलेल्या उमेदवाराचीही अर्थपूर्ण काळजी घेतली. त्यामुळे थोड्या मतांनी ती जागा भाजपाने जिंकली. भाजपाला महाराष्ट्रात एकट्याच्या तकतीवर बहुमत मिळणे शक्य नाही, हे स्पष्ट झाल्यामुळे आगोदर तगडा मराठा उमेदवार म्हणून चंद्रकांत पाटील हा प्रयोग पाच वर्षांपूर्वी सुरू झाला... विधान परिषदेत पाच वर्षे तोंड न उघडलेले त्यावेळचे भाजपाचे आमदार चंद्रकांत पाटील महसूलमंत्री होताच 'चंद्रकांतदादा' झाले. 'भाजपाचे उद्याचे मुख्यमंत्री', अशीही त्यांची जाहिरात सुरू झाली. पण या नेत्याला आवाका नाही. स्वत:चा मतदारसंघ नाही. कोल्हापुरातून ते निवडून येऊ शकत नाही, म्हणून कोथरूडमध्ये 'भावे-आपटे-गोडबोले' यांचे मताधिक्य असलेल्या मतदारसंघात त्यांना उभे करून निवडून आणले. आता त्यांचे महत्त्व एकदम संपलेले आहे. फडणवीस भजपाच्या बहुमताचे राज्य आणू शकत नाहीत. मग 'शिंदेप्रयोग' सुरू झाला. शिंदे यांच्या मर्यादा स्पष्ट झाल्यावर 'दादाप्रयोग' झाला.. दादांचा राष्ट्रवादी गट सामील झाल्यावर 'आमचे स्वतंत्र अस्तित्त्व ठेवणार' अशी जाहिरात झाली. पण, शरण आलेल्याला स्वत:चे अस्तित्त्व नसते, याचा प्रत्यय लगेच येऊ लागला. दादांनी मोदींचा जयजयकार सुरू केला... तेच पंतप्रधान होणार, असे दादा सांगू लागले... त्यामुळे सगळी 'दाने' दादांच्या बाजून पडणार, हे स्पष्टच होते... त्यामुळे दादांना घड्याळ मिळाले, यात फार मोठी धक्कादायक गोष्ट काही नाही. निवडणूक आयोगाचे दान दादाच्या बाजूने पडणार, हे ठरलेच होते. पण, महाराष्ट्रातील मतदारांचे 'मतदान' दादांच्या बाजूने पडणार की नाही, हे अजून ठरायचे आहे. दादांनी अमोल कोल्हे यांना सांगून टाकले, 'गेल्यावेळी मी तुला निवडून आणले होते... आता कसा निवडून येतोस, बघतोच...' अर्थात कोल्हे निवडून येणे किंवा ते पराभूत होणे, हा निर्णय दादांच्या हातात नाही. तो मतदारांच्या हातात आहे. दादांच्या हातात सत्ता आहे... पण, मतदारांना ते जे गृहित धरीत आहेत तिथेच त्यांची फसवणूक होईल. या महाराष्ट्रातील मतदारांना गृहित धरू नका... घड्याळ मिळाले... फटाके फोडा... पेढे खा.. पण, थोडे सबुरीने घ्या. कोल्हे यांना पराभूत केल्यानंतर 'मी पाडले' म्हणा... आगोदर बोलून तुमचे हसे होईल... यापूर्वी भाजपाविरोधात तुम्ही काय काय बोलत होतात. आणि आता काय बोलताय... लोकांना एवढे गृहित धरू नका... निवडणूक चिन्ह म्हणजे सर्वस्व नव्हे... मतदार आता एवढे मूर्ख राहिलेले नाहीत. तेही दिवस लोकांना माहिती आहेत.... जेव्हा इंदिरा गांधी यांची गाय-वासरू ही निशाणी रद्द झाली. नवे चिन्ह घ्यायची सूचना आली... अपक्ष उमेदवारांसाठी अडगळीत पडलेली जी चिन्हे होती त्यात 'हाताचा पंजा'ही पडलेला होता. वसंत साठे यांनी तो शोधून काढला. इंदिराजींना सांगितले... आणि त्या पंजाने काय चमत्कार केला... हे दुनियेने पाहिले. चिन्ह म्हणजे सर्वस्व नव्हे. आता 'शरद पवार यांच्यावर आपण विजय मिळवला' अशा घमेंडीमध्ये दादा आणि त्यांचा गट फटाके फोडत आहेत... आनंद साजरा करीत आहेत... त्यांच्या आनंदात विरजण कशाला घाला? करू देत साजरा... पण, भाजपाचे 'घी' त्यांनी बघितले असले तरी 'बडगा' बघितलेला नाही. शिंदे असोत किंवा दादा असोत, त्यांच्याबद्दल भाजपाला काहीही पडलेले नाही. आता आपल्याला जे उपयोगी आहे, त्याचा वापर करायचा... आणि जे आपल्या बाजूला आले तेही हुरळून जाणारे असल्यामुळे... त्यांना वापरून घेतील आणि गरज संपली की विषय संपेल... हा एका वर्षाचा अनुभव नाही. दादा, तुमचे तर सोडून द्या... तुमच्या हातात सत्ता नसेल तर तुम्ही नेमके किती मोठे नेते आहात, हे महाराष्ट्र जाणतो... जेव्हा भाजपवाल्यांनी रामाला वापरले, गंगा माईला वापरले.... नंतर याच भाजपवाल्यांनी अनेक वर्षांनी रामाला वनवासात पाठवून दिले होते. गरजेपुरता राम नामाचा गजर करणारे... शिंदे आणि दादांची पत्रास बहुमत मिळाल्यानंतर काय ठेवणार आहेत? दादांना ते नंतर कळून येईल.. तो दिवस फार लांब आहे, असे दादा समजू नका. शरद पवारसाहेबांच्या पक्षाचे नाव आता 'राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार' असे आहे. थोडे मनाला विचारून पहा.... जेव्हा 'राष्ट्रवादी' नाव होते तेव्हाही तो पक्ष 'शरद पवार' याच नेत्यामुळे उभा होता. आज दादांच्या भोवती जो गोतावळा जमा झालाय आणि ज्या गोतावळ्याने स्वत:ला सर्व अर्थाने मजबूत करून घेतल्यानंतर, पवारसाहेबांपासून जे दूर झाले आहेत ते आजचे सगळे... धनवंत, गुणवंत, ज्ञानवंत, प्रज्ञावंत, अर्थवंत.... एकजात सगळे... शरद पवार या नावावरच मोठे झालेत... 'घड्याळ' हे निमित्त होते... सत्ता येते आणि जाते.. 'कृतज्ञ' आणि 'कृतघ्न' यातील फरक इतिहासात कायम राहतो... निवडणुकीतील जय आणि पराजय.... इतिहास जरा तपासा... अकबराच्या दरबारात मानसिंग... हा शरणागत मानसिंग 'राजा' झाला... पण, अकबरापुढे झुकूनच त्याला उभे रहावे लागे. आणि महाराणा प्रताप ताठ मानेने उभा राहिले... इतिहासात मानसिंग मोठा की महाराणाप्रताप? याची उत्तरे आहेत... 'कोणत्याही मार्गाने सत्ता' हे जीवनाचे यश नाही. खंबीर राजकीय भूमिका, आपल्या मूळ पक्षाच्या निष्ठा, या जीवनाच्या कसोट्या आहेत. महाराष्ट्रात तरी अशा नेत्यांना अत्यंत आदराने पाहिले जाते... भले त्यांच्याकडे बहुमत नसेल... सत्ता नसेल... सत्तेसाठी ५१ सदस्यांची गरज आहे... पण, लोकांचे प्रश्न घेवून रस्त्यावर उतरणाऱ्यांसाठी महाराष्ट्रातील जनतेच्या मनात आदराचे स्थान आहे. मग ते कॉ. बर्धन असोत... सुदाम देशमुख असोत... उद्धवराव पाटील असोत... एन. डी. पाटील असोत... गणपतराव असोत, विदर्भात लढणारे जांबुवंतराव असोत... सत्तेमुळे ही माणसं मोठी झाली नाहीत. पक्ष बदलून ही माणसं मोठी झाली नाहीत. अर्थात दादा हे तुम्हाला सांगण्यात काही अर्थ नाही. आजच्या तारखेला तुमच्या बाजूने 'दान' पडले... त्यामुळे फटाके फुटतील हे मान्य आहे. पण, सगळे दिवस सारखे नसतात, एवढे लक्षात ठेवा. मी अनेक दिवस लिहितो आहे... आज पुन्हा लिहितो... महाराष्ट्र विधानसभेत शिंदे, फडणवीस, दादा हे व्यक्ती म्हणून, त्यांचा जो काही पक्ष आहे, तो पक्ष म्हणून, आणि अगदी दिल्लीहून मोदी-शहा यांच्या गल्लीगल्लीत सभा लावल्या तरीही महाराष्ट्रातील जनता आताच्या चेहऱ्याच्या सरकारला पुन्हा सत्तेवर बसवणार नाही... हे पुन्हा सांगतो... तो निकाल जेव्हा लागेल तिथर्पंत मी जिवंत असेनच... दादा, तुम्हाला तर १०० वर्षांचे आयुष्य मिळो. कारण तुमचे निर्णय चुकले, त्याचा पश्चाताप होण्यासाठी तुम्हाला भरपूर जगायचे आहे. 'कोणत्याही मार्गाने सत्ता हे आयुष्याचे समाधान नाही.' हे तुम्हाला एक दिवस पटेल... तो दिवस फार लांब नाही. आता प्रश्न असा आहे की, या निवडणुकीत काय होईल? सगळा मिडीया भाजपाच्या बाजूला आहे... सत्ता,संपत्ती, सगळ्या यंत्रणा सत्ताधाऱ्यांच्या हातात आहेत. आता महाराष्ट्र एका अराजकाच्या परिस्थितीतून जातोय... पोलीस स्टेशनमध्ये आता जे काही गोळीबाराचे धिंगाणे झाले आहेत, ते जर काँग्रेस राजवटीत झाले असते... तर हेच फडणवीस... हेच शेलार, रस्त्यावर थय-थया नाचले असते.. कायदा-सुव्यवस्था हा विषय खूप मोठा आहे. आजचा सगळ्यात मोठा भेडसावणारा प्रश्न आहे तो, सामाजिक धटींगणपणाचा... कोणालाही न जुमानण्याची जी सामाजिक प्रवृत्ती वाढीला लागलेली आहे, ती आटोक्यात आणणे, सरकारला आता शक्य नाही. विषय साधे असले तरी धटींगणाचेच ते निदर्षक आहेत. रस्त्याच्या डाव्या बाजूने जाणाऱ्या वाहनांच्या समोर डाव्याच बाजूने लाईट लावून समोर वाहने येतात. त्याला हटकले तर तो मारामारीच्या तयारीत उतरून सांगतो, 'लाईट लावलेला दिसत नाही का?' हा धटींगपणा एका दिवसात आलेला नाही. राजकारणातून तो पाझरत समाजात आलेला आहे. आता आम्ही काहीही केले तरी आमचे कोणी वाकडे करू शकत नाही. असा अभिन्वेश समाजात ज्यावेळी निर्माण होतो, त्यावेळी समाजव्यवस्था कोलमडून पडते. आज पोलीस यंत्रणेवर असलेला ताण... गृहमंत्र्यांना तरी त्याची कल्पना आहे का? एकच समाधानाची गोष्ट आहे की, सामान्य माणूस या धटींगणाबद्दल बोलत नसला तरी तो मनातून संतप्त आहे. जे-जे राजकीय धिंगाणे चालू आहेत ते शांतपणे तो पाहात आहे. आणि ही 'शांतता' हेच त्या माणसाचे सगळ्यात मोठे सामर्थ्य आहे. धटींगणपणाचा पराभवही हीच शांतता करणारा आहे. आणि या अस्वस्थ असलेल्या सामान्य माणसाचे मतदान.. आजच्या घटकेला तरी कोणाला 'दान' झालेले नाही. त्यामुळेच देशाच्या पंतप्रधानांनासुद्धा दहा वर्षे राज्य केल्यावर लोकसभेतील अर्थसंकल्पीय चर्चेच्या उत्तरात अजून 'गांधी-नेहरू' यांची नावे घेऊनच त्यांच्याविरोधात भाषण करावे लागत आहे. गांधी-नेहरू यांना जावून किती वर्षे झाली. तरी त्यांची अजून भिती वाटते आहे. मोघल सैन्याच्या घोड्यांना पाणी पिताना 'संताजी-धनाजी' दिसत होते. आज एवढा प्रचंड विकास केल्यानंतर, प्रभूरामाची प्राणप्रतिष्ठापना झाल्यानंतर, ३७० कलम रद्द केल्यानंतर, सगळ्या गॅरेंट्या दिल्यानंतरही, तुम्हाला गांधी-नेहरू- कॉंग्रेसची भिती वाटण्याचे काहीच कारण नाही. तुमचा नारा चारसौ पार आहे.. मग सकाळपासून रात्री झोपेपर्यंत गांधी-नेहरू आणि काँग्रेस यांच्याबद्दल कशाला बोलता? तुमचे काहीतरी सांगा... गांधींनी दोन शब्दांत देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले हे जग जाणते... नेल्सन मंडेला हे कोण आहेत, ते भाजपाला माहिती आहे ना... त्यांचे गुरू गांधी आहेत. नेहरू १७ वर्षे पंतप्रधान राहिले म्हणून सांगितले जाते... पण, जवळपास १९ वर्षे नेहरू-गांधी कुटुंबाने देशाच्या स्वातंत्र्यासाठी सक्त मजुरीच्या शिक्षा भोगल्या. एकदा कधीतरी याचा उल्लेख करा ना... तुम्हाला सगळं आयते हातात मिळालेले आहे. जे आज बोलत आहेत ते चार वर्षांचे होते तेव्हा देशात पाच आय. आय. टी स्थापन झाल्या होत्या. भाक्रा-नांगल धरणाची निर्मिती झाली होती. हा विषय कितीतरी पटीने आणखीन सांगता येईल. मुद्दा एवढाच आहे की, त्या-त्या परिस्थितीत ते- ते सरकार निर्णय करते. आलेल्या सरकारने मागच्या सरकारचे काढायचे नसते... मृत व्यक्तींबद्दल तर बोलायचेही नसते. माजी पंतप्रधानांचा आदर करायचा असतो... इथे तर आपल्या माजी पंतप्रधानांची (मनमोहनसिंग) 'ते आंघोळीला जातानाही रेनकोट घालतात' अशीही टिंगल झाली. लोक हे सगळं शांतपणे पाहात आहेत. ऐकत आहेत... देशभर ऐकत आहेत... महाराष्ट्रातील तमाम जनता खूप शहाणी आणि समंजस्य आहे... या राज्याचे नाव 'महा'राष्ट्र आहे... या राज्याच्या विधानसभेने केलेले दहा कायदे देशाने स्वीकारलेत... ती मोठी माणसं आणि ते कायदे एकदा आठवून पहा... दादा तुम्हाला नम्रपणे सांगायला हवं... 'दादा तुम्ही वेगळा गट केलात तेव्हा पवारसाहेबांचा फोटो लावून मिरवत होतात...' पवारसाहेबांनीच हरकत घेतली... म्हणून त्या जागेवर आता यशवंतराव चव्हाणसाहेबांचा फोटो आला... कुठे ते यशवंतराव चव्हाणसाहेब... आणि कुठे आताचा कारभार... कशाची काही तुलना होऊ शकते का दादा...? खूप लिहिता येईल... पण एवढे मात्र नक्की... तुमच्या बाजूने सगळी 'दाने' पडली तरी सगळ्यात महत्त्वाची या महाराष्ट्रातील माणसाची जी शक्ती आहे ते म्हणजे प्रत्येक सामान्य माणसाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला एका मताचा अधिकार... जगातील सर्वोच्च न्यायलयाच्या पेक्षाही आणि जगातील कोणत्याही सरकारपेक्षाही हे एक मत सगळ्यात भारी असे 'शासन' आहे. शासन बनवणारे ते आहे. आणि चुकीचे वागणाऱ्या भल्याभल्यांना त्यांची जागा दाखवून देणारेही तेच एक मत त्यावेळी शासनच बनते. म्हणून तर अनेकजण पराभूत झाले. ते सामान्य माणसांनीच केलेत... आणि म्हणून तुमच्या बाजूला सर्व शक्तीमान भाजपा असला तरी महाराष्ट्र तुम्हाला जिंकता येणार नाही. हा पुरोगामी महाराष्ट्र आहे... सत्तेसाठी तुमचा रस्ता चुकलेला आहे... तुम्हालाही तुमची जागा मतदार दाखवून देतील... अमोल कोल्हे तर निवडून येईलच... पण ज्यांना राजकारणात आज फार 'मोल' नाही, ते साधे- साधे कार्यकर्तेही या निवडणुकीत नवीन चेहरे टाकले तर तेही निवडून येतील... इतिहासाची पानं उलटून बघा... आणि पवारसाहेब थकले असे पुन्हा म्हणू नका... सिंह कधी म्हातारा होत नसतो.. चार महिन्यांनी आपण सगळा हिशेब पुन्हा मांडू या... सध्या एवढेच..

मधुकर भावे

९८९२०३३४५८

# विद्यापीठांतील डाव्यांची नाटकं ; पुणे विद्यापीठाला JNU कोण करतय?

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच आपल्या शैक्षणिक प्रवासाचं हे अमृतमहोत्सव वर्ष. शिक्षणाचे माहेरघर,ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट अशी बिरूध असणाऱ्या विद्यापीठाची कधी नव्हे तेवढी चर्चा अनावश्यक कारणाने गेल्या काही दिवसांपासून होते.

पण ही चर्चा जाणीवपूर्वक केली जातेय का? का काही कुणी घडवून आणण्यासाठी अदृश्यपणे काम करते आहे? यामागे काही राजकीय प्रपोगंडा आहे का? याचे या निमित्ताने चिंतन..

***२ फेब्रु घटना साक्षीदार म्हणून..***

विद्यापीठाचा ललित कला हा कला,नाट्य,संगीतशिक्षण आणि प्रशिक्षण देणारा विभाग. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा जब वी मेट हा परीक्षा प्रयोग प्राध्यापक विद्यार्थी आणि कलाप्रेमी या सर्वांच्या समोर सुरू असताना प्रयोगाच्या सुरुवातीलाच अश्लील भाषेचा आधार घेऊन राम सीता लक्ष्मण आणि रावण ही पात्र विनोदासाठी खालची भाषा, लक्ष्मण सीता यांना विसंगत उपमा आणि गलिच्छ शिव्या, भागा भागा राम भागा हे न पटणारे पार्श्वगीत त्यातच ज्यावेळी सीतेच्या तोंडी सिगारेट आले त्यावेळी अनेक सज्ञान प्रेक्षकांना आणि अभाविपच्या कार्यकर्त्यांना न पटल्याने प्रयोग थांबविण्यात आला.

ज्यावेळी अभाविपचे कार्यकर्ते आणि काही विद्यार्थी कला मंचावर गेल्यावर ललित कलाच्या आक्रमक विद्यार्थ्यांनी व्हिडिओ शूटिंग करणाऱ्या सामान्य विद्यार्थ्याला धक्काबुक्की केली त्याचवेळी बाचाबाची झाल्यानंतर ललितच्या विद्यार्थ्यांनी काठ्या, टिकाव, रॉड काढून हिंसक प्रतिक्रिया देऊन काहींना मारहाण केली. अर्थात हंगामा होणार याची पूर्वकल्पना असल्यानेच त्यांनी पूर्वतयारी केली असावी.

याचा व्हिडिओ आणि रुग्णालयाची बिले याचा पोलिसांनी ऋखठ नोंद करताना आधार घेतला. यात राजकीय संधी दिसतात हिंदू विरोधी संघटना आणि त्यांनी पाळलेली मीडिया यांनी उलटच अभाविपने मारहाण केली असा कांगवा केला म्हणजेच उलटा चोर कोतवाल को दाटे ही परिस्थिती.

अभाविपने आणि रामावर आस्था असणाऱ्यांनी केवळ प्रा. भोळे व कलाकारांनी माफी मागावी व प्रकरण मिटते घ्यावे असा पवित्रा घेतला मात्र दिलगिरी व्यक्त न करता उलटच अरेरावी उर्मट वर्तन करत तुम्हाला पोलीसात दाखवू अशा शब्दात घडलेल्या घटनेचे समर्थन केले. परिणामी विनाशकाली विपरीत बुद्धीमुळेच इथे सगळे प्रकरण चिघळले आणि स्वतः च्या कुकर्माचे वाभाडे काढत विद्यापीठाला बदनाम केले,असो.....

***यानिमित्ताने काही प्रश्न...***

हा प्रयोग ललितच्या अंतर्गत परीक्षेचा भाग होता



आणि पडद्यामागचे कलाकाराचे आयुष्य दाखवण्याचा प्रयत्न होता असा दावा करण्यात आला. मात्र अंतर्गत परीक्षा असो वा कलाकारांची पडद्यामागची भूमिकेत हिंदू देविदेवता किंवा राम हाच अश्लील विनोदासाठी कसा होऊ शकतो!! इतकीच धार्मिक चिकित्सक विनोदाची खाज असेल तर इतरही धर्मांचे कधी विडंबन विनोदासाठी करून तर बघा. मुळातच हिंदू पूर्वापार सहिष्ण असल्यामुळे द्वेषातून ना 'रडण्याची' ना गळे चिरण्याची संस्कृती आहे.रामायण महाभारत ही भारतीय संस्कृतीची प्रत्येक मनुष्यासाठी परमआदर्श ईश्वरीय सदपुरुष आहेत अनेकांच्या आस्थेशी श्रद्धेशी खेळणारी कोणती अभिव्यक्ती असू शकते आणि संविधानाच्या कलम १९(१)- अनुसार अभिव्यक्ती बरोबर काही मर्यादांचेही बंधन आहे.

गेल्या दोन वर्षापासून अप्रत्यक्षपणे अनेकदा हिंदू अस्मिता संस्कृती यांची विडंबना करण्याचा प्रयत्न होतोय अनेकदा काही विद्यार्थ्यांनी मौखिक तक्रारही विभाग प्रमुखांकडे केली होती. काहीचा विरोध असतानाही गुणांच्या भितीमुळे असे प्रयोग करावे लागतात.मात्र जाणीवपूर्वक काही प्राध्यापक अशा गोष्टी करण्यास पाठबळ देताना दिसतात असा अनेक विद्यार्थ्यांचा आरोप आहे.

***विद्यापीठाला JNU कोण करतय....***

खरंतर गच्छण लाच रचनात्मक पद्धतीने डाव्यांनी विद्यार्थी चळवळींच्या नावाखाली देशविघातक आंदोलने आणि विशिष्ट धर्म आणि संघटनांच्या द्वेषापोटी नक्षलवाद, आतंकवाद,जातीयदंगली घडवण्याचा प्रयत्न करून बदनाम करण्याचे महापाप केले. ह्याच कनैय्याकुमार,उमर खालिद,योगेंद्र यादव यांचे ह्याच संघटना आणि विद्यापीठातील अनेक प्राध्यापक आहे त्यांच्या कृतीच्या आणि विचारांचे ते जाहीर समर्थनही करतात..काही दिवसांपूर्वी पुण्यातील सिंबोयसिस,मॉडर्न कॉलेज आणि आत्ताची ऋढख ह्या प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थेत श्री रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठाच्याच वेळेस बाबरीचे मज्जिदेचे समर्थन करून हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी जाब विचारता हिंसा केली.म्हणजेच यांना सुप्रीम कोर्ट,घ.घ. मोहम्मद यांचा -डख रिपोर्ट ही मान्य नाही अर्थातच तिथे श्री राम आहे म्हणून.

गेल्या दोन वर्षापासून अप्रत्यक्षपणे अनेकदा हिंदू अस्मिता संस्कृती यांची विडंबना करण्याचा प्रयत्न होतोय अनेकदा काही विद्यार्थ्यांनी मौखिक तक्रारही विभाग प्रमुखांकडे केली होती.मात्र जाणीवपूर्वक काही प्राध्यापक अशा पाठबळ देताना दिसतात असा विद्यार्थ्यांचा आरोप आहे. प्रयत्न करून बदनाम करण्याचे महापाप केले. ह्याच कनैय्याकुमार,उमर खालिद,योगेंद्र यादव यांचे ह्या संघटना आणि विद्यापीठातील अनेक प्राध्यापक आहे त्यांच्या कृतीच्या आणि विचारांचे ते जाहीर समर्थनही करतात. गेल्याच वर्षी विद्यापीठांतील प्रश्नांच्या नावाखाली आंदोलनात दिल्ली(मोदी सरकार) से आजादी, हिंदुत्व से आजादी च्या घोषणा दिल्या गेल्या.स्वतंत्र भारतात आजादी ओरडत यांना काय कोणती आजादी पाहिजे यातील छुपा अजेंडा लक्षात घेणे गरजेचे. भ्रमित राजकारण.

अनेक वेळा तथाकथित डाव्या संघटना विनाकारण विद्यापीठाच्या प्रशासनाला वेठीस धरून राजकीय संघटनांचा आणि नेत्यांचा हस्तक्षेप करून फक्त मीडियात पोकळ हवा करण्यासाठी काँग्रेस आणि मार्क्सवादी तसेच आंबेडकांच्या साहित्याचा विपर्यास करून हिंदू विरोधी प्रक्षोभक वक्तव्यं करणारे आणि विद्यापीठातील कर्मचाऱ्यांचा अरेरावी करत अपमान करून राजकीय स्टंट करणाऱ्यांचा विद्यापीठ अड्डा होतोय का याची चिंता वाटायला लागली आहे.. कारण ८/१० वर्ष विद्यापीठात केवळ अभ्यासाच्या नावाखाली घालवायचे.अनावश्यक विषयात झक्कू करून सरकारची स्कॉलरशिप लुटायची.माफक दरात वसतिगृह मिळते आणि आता फुकटचे भोजनही. विद्यार्थी नेता मिरवून राजकारणाच्या स्वप्नात रमत स्वतः बरोबर कुटुंबालाही उध्वस्थ करून आपली बौद्धिक दिवाळखोरीची कमतरता झाकण्यासाठी नोकऱ्या कुठे आहे म्हणत पुन्हा केवळ आजच्याच सरकारला दोष देत प्रत्येक दिवस आविर्भावात काढायचा हाच यांचा दिनक्रम.

**छुपा अजेंडा**

नाटक, लोकगीत, व्याख्यानमाला, चर्चासत्र यातून अनेकदा अनेक विभागांमध्ये डाव्या विचारधारा असणाऱ्या वादग्रस्त लेखक आणि विचारवंतांची व्याख्याने विद्यार्थ्यांच्या माथी मारून त्यांना केवळ क्रांतीची भाषा शिकवून वैचारिक हिंसक बनवण्याचा प्रयत्न होतोय.विद्यापीठाचा अभ्यासक्रम ठरावताना डाव्याच विचारवंतांची हिंदू विरोधी लेखकांचीच पुस्तके का निवडली जातात?? हा फार विचार करून व्यवस्थेवर वर्चस्व तयार करण्याचा डाव आहे यात तिळमात्र शंका नाही.

युवकांच्या बौद्धिक नवनिर्मितीसाठीची जबाबदारी ज्यांच्यावर आहे तेच प्राध्यापक डाव्या विशिष्ट द्वेषात्मक राजकीय विचारांचा पट्टा गळ्यात घालून नव्या पिढीला भ्रमित करत आहेत मात्र गुणांचा प्रश्न असल्याने विद्यार्थी सज्ञान असूनही शांत राहतो कारण व्यक्तिगत भविष्याचा प्रश्न असतो.

विद्यापीठात अनेक वेळा हिंदू धर्माच्या उत्सवांना सहजासहजी परवानगी विद्यार्थ्यांना दिली जात नाही. गणेश उत्सवात ज्ञानोबा तुकोबाचा विचार मांडणाऱ्या वारकरी संप्रदायाच्या युवाकीर्तनकाराचेही कीर्तनही विद्यापीठ प्रशासन आणि काही हिंदुद्वेषी विद्यार्थी संघटनांनी होऊ दिले नाही. उलटपक्षी पोलीस कारवाईचा इशारा दिला.

२२ जानेवारीला देश दिवाळीप्रमाने उत्साहात असताना विद्यापीठात राम मंदिराच्या सदिच्छा संदेशाची पत्रक वाटताना ही विरोध केला. त्या दिवशी काळी वस्त्र, रिबीन बांधून मांसाहाराच्या पार्ट्या करून स्टेटस ठेऊन अप्रत्यक्षपणे भावनात्मक डिवचवण्याचा प्रयत्न करून अनेकांना 'काय साध्य करायचे आहे, कोणते प्रति आव्हान ते देऊ पाहत आहे.??

अक्षरशः धार्मिक किंवा जातीय आधार घेऊन काही प्राध्यापक कर्मचारी विद्यार्थ्यांशी असंतुलित वागणूक देतात, प्रशासकीय कामे करण्यासाठी लाच मागितली जाते व लाच घेणाऱ्याला रंगेहात पकडल्यावर काँग्रेस प्रणित कामगार संघटना त्याच्या बचावाला लगेच धावून येते म्हणजे याला पाठीशी कोण घालते हे स्पष्ट होते.

श्री शंकर महाराज ट्रस्ट गरीब वंचित विद्यार्थ्यांना एक वेळ मोफत जेवण वाटप करत असतानाही विद्यार्थी हित न बघता काँग्रेस आणि डाव्या संघटनांनी जाणीवपूर्वक एका विशिष्ट हिंदू धर्माचे म्हणून प्रचंड विरोध का केला?? गेल्याच दोन महिन्यांपूर्वी संविधानिक पदावरील पंतप्रधानांबद्दल अतिशय खालच्या भाषेत भिंतीवर व्यक्तिगत टिप्पणी सर्वसामान्य कुटुंबातील शिकायला आलेला विद्यार्थी एकटा कसा करू शकतो यामागे नेमकी कोण? आणि याचे खुले समर्थनही केले जाते!! संविधानिक सरकार व व्यवस्था असतानाही राजकीय आदर्शवादी सिद्धांताची मोडतोड करून विद्यार्थ्यांच्या मनात अन्यायाची भावनेला चिथावणी देवून त्यांना वैचारिक द्वेषात्मक हिंसक कोण करतंय??

सर्वसामान्य विद्यार्थ्यांचा ब्रेन वॉश करून रामायण महाभारत भारतीय संस्कृती आणि परंपरा विचारधारा कल्पोकल्पित आहेत ही चर्चासत्र आयोजित ह्याच विद्यापीठात का होतात?

संविधानाचा कांगावा करणाऱ्यांनी दुसऱ्याच्याही मूलभूत स्वतंत्र,हक्क, अधिकार यांचा अभ्यास करावा. केवळ समता बंधुता लोकशाही स्वातंत्र्य यांच्या पोकळ वल्गना ढोंगी वाटतात आणि त्या तुमच्या चेहऱ्यावर ही दिसतात. ह्याच कपटी अजेंड्याचा शोध जागृत समाजाने आणि व्यवस्थेने वेळ असताच घेणे अत्यावश्यक आहे.

म्हणून आपल्याला कोणता व्यक्ती, समाज निर्माण करून पुढील पिढ्यांची दिशा आणि दशा ठरवण्यासाठी रावण नाही तर राम आणि रामच दीपस्तंभ आहे. केवळ अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या गप्पा मारण्यापेक्षा अभिव्यक्तीचा स्वैराचार करून धार्मिक आणि जातीय मानसिकता शैक्षणिक वातावरणाला दूषित करून युवकांच्या आयुष्याशी गलिच्छ खेळतेय हे नक्की.

खरंतर राम हा धार्मिक आस्था आणि श्रद्धा यांच्याही पलीकडे व्यक्तिगत,कौटुंबिक, सामाजिक आणि राजकीय प्रेरणा स्त्रोत राहिला आहे.

राजकीय सत्तेत छत्रपती शिवाजी महाराजांपासून स्वातंत्र्याच्या चळवळीत महात्मा गांधी राम पर्यंत. सामाजिक सुधारणात स्वामी दयानंद सरस्वती पासून विवेकानंदापर्यंत.धार्मिक सुधारणेत कबिरापासून वारकरी संप्रदायापर्यंत अनेकांच्या केंद्रस्थानी श्रीरामच आहे. ज्या मूलभूत हक्कांचा आज उहापोह केला जात आहे त्याच संविधानाच्या तिसऱ्या प्रकरणाच्या सुरुवातीलाच आंबेडकरांनी राम लक्ष्मण सीता यांचे मूळ संविधानावर सुंदर चित्र रेखाटून घेतले आहे. त्याग,तपस्विता, समभाव,एकवचनी, एकनिष्टी, तत्वपरायन,आदर्श पुत्र,पती,पिता,प्रजापती आणि शत्रुही असा हा मर्यादा पुरूषोत्तम प्रभू श्रीराम अनंत, अनादी,अटळ आणि शास्वत सत्य आहे.म्हणून सूर्याकडे पाहून थुंकणाऱ्यांनी आपल्या चेहऱ्याचे आणि चारित्र्याचे अगोदर आत्मचिंतन करावे...

**- महेश रहाणे पुणे विद्यापीठ**

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# तंत्रज्ञानाचा उपयोग मानव शांतीसाठी करावा : डॉ. प्रसाद खांडेकर

## एमआयटीत 'डिजिटल डिझाइन' विषयावर आंतरराष्ट्रीय परिसंवाद



पुणे : भारतीय अध्यात्म आणि तंत्रज्ञान यांचा समन्वय साधणे गरजेचे आहे. मानवाच्या शांतीसाठी आधुनिक युगात कॉन्सियसनेस मॅथेमॅटिकल मॉडेल तयार करता येईल का हे पाहणे गरजेचे आहे. त्याच प्रमाणे संस्कृत भाषेचा वापर करून नवे तंत्रज्ञान कसे विकसित करता येईल यावर अधिक भर दयावा. असे विचार डीईएस युनिव्हर्सिटीचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रसाद खांडेकर यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या डिपार्टमेंट ऑफ पीस स्टडीज आणि पीस रिसर्च इन्स्टिट्यूट ओस्लो यांच्या संयुक्त विद्यमाने कोथरूड येथील एमआयटी डब्ल्यूपीयूच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात दोन दिवसीय 'डिजिटल डिझाइन' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिसंवाद आयोजित करण्यात आला. याच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी पीस रिसर्च इन्स्टिट्यूट ओस्लो येथील संशोधक प्रा. असिल्ड कोलास या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी चे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड हे होते.

कार्यक्रमाचे संयोजक डॉ. प्रियंकर उपाध्याय व प्रा. डॉ. अंजु उपाध्याय हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद पात्रे व प्रोग्रॅम डायरेक्टर डॉ. भागवत बिराडी हे उपस्थित होते. या परिषदेला देश विदेशातील जवळपास शेकडो लोक उपस्थित होते.

या कार्यक्रमाला एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या प्रसंगी पीस स्टडीजच्या ब्रोशरचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्याच प्रमाणे डब्ल्यूपीयूमध्ये येत्या शैक्षणिक वर्षापासून नव्याने सुरू करण्यात येणार्या एम. ए पीस ॲण्ड कॉन्फ्लिक्ट मॅनेजमेंट हा पाठ्यक्रमाची घोषणा करण्यात आली.

डॉ. प्रसाद खांडेकर म्हणाले,भारतीय तत्वज्ञानाचा अभ्यास करून आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात याची परिभाषा समजून घेणे गरजचे आहे. मानव सतत शांतीच्या शोधात असतो. परंतु डिजिटल युगात त्या पासून दुरावला आहे. अशा वेळेस त्याचाच उपयोग करून शांतीच्या मार्गावर चालावे.

# भारत देशाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रवादीवतीने स्मृतीचिन्ह प्रदान

(अजित जगताप )

सातारा दि: अनेक शूरवीर व क्रांतिकारक स्वातंत्र्यसैनिक यांच्या बलिदानाने भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले आहे. या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष सामाजिक न्याय विभाग सातारा जिल्हा अध्यक्ष श्री रमेश अनिल उबाळे यांच्या वतीने ७५ गुणीजनांचा स्मृतिचिन्ह व गौरव करून त्यांना सन्मानित करण्यात आले.

आपला भारत देश हा सर्व जाती धर्माच्या लोकांना एकत्र करून गुण्यागोविंदाने विकास कामे करत आहे. या विकास कामाला खऱ्या अर्थाने योगदान देणारे चार स्तंभ आहेत. त्यामध्ये प्रशासन, न्यायपालिका, वृत्तपत्र व संरक्षण विभाग यांचे महत्त्वाचे योगदान आहे. याची जाणीव ठेवून सातारा जिल्ह्यामध्ये सर्वसामान्यांना न्याय देण्याची भूमिका घेणाऱ्या अधिकारी वर्गाला शुभेच्छा त्यांचा सन्मान करण्यासाठी संविधान उद्देशिका स्मृतीचिन्ह वितरित करण्याचा त्यांनी मानस केला होता. त्याप्रमाणे प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या सातारा जिल्ह्यातील ७५ अधिकाऱ्यांचा गौरव करून



**अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ७५ अधिकाऱ्यांच्या प्रत्येक स्वरूपात सन्मान करताना (छाया- निनाद जगताप, सातारा)**

श्री उबाळे यांनी खऱ्या अर्थाने अमृत महोत्सव वर्ष साजरा केला आहे.या त्यांच्या उपक्रमाला अधिकारी वर्ग व समाजातील विविध स्तरातून चांगला उदंड प्रतिसाद मिळू लागलेला आहे. शासकीय पातळीवर काम करत असताना अधिकारी वर्गाचा वेतन मिळते, भत्ता मिळतो, परंतु खऱ्या अर्थाने सामाजिक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांकडून स्मृतिचिन्ह मिळणे. हा खूप मोठा गौरव आहे. देशाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त त्यांनी दिलेले स्मृतिचिन्ह म्हणजे आमच्या दृष्टीने ही कुलदैवताची प्रतिमा आहे. तिचा आम्ही देव्हाऱ्यात प्रतिष्ठापना करून दररोज पूजन करीन अशा शब्दात अधिकाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या वेळेला विभागीय आयुक्त ते वर्ग एक अधिकाऱ्यांपर्यंत संविधान उद्देशिका स्मृतिचिन्ह सन्मानाने व यथोचित स्वागत करून देण्यात आले. या उपक्रमाबद्दल श्री रमेश अनिल उबाळे यांचे व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तसेच सामाजिक न्याय विभागाचे अनेकांनी धन्यवाद दिले.



# शिव कामगार सेनेच्या प्रसिद्धीप्रमुख पदी राजेंद्र सोनार

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान

**पुणे:** राजेंद्र सोनार यांची शिवसेना (बाळासाहेब ठाकरे) प्रणीत शिव कामगार सेनेच्या प्रसिद्धी प्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली. शिवसेना भवन सारसबाग येथील मुख्य कार्यालयात शिवसेना नेत्या व विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांनी नियुक्तीपत्र प्रदान केले.

या प्रसंगी शिव कामगार सेना अध्यक्ष सुधीर कुरुमकर व अन्य मान्यवर उपस्थित होते. राजेंद्र सोनार हे मुक्त पत्रकार असून गेली ३३ वर्ष प्रसिद्धी क्षेत्रांत कार्यरत आहेत.

आगामी काळात कामगारांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी लोकशाही मार्गाने कार्य करून शिव कामगार सेनेचे कार्य समाजाच्या तळागाळात पोचविणार असल्याचे राजेंद्र सोनार यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

## पाचगणीत घरात घुसून वृध्द महिलेवर माकडाचा हल्ला ; महिला गंभीर जखमी

**पाचगणी :** पाचगणी येथे गॅलरीत बसलेल्या एका वयोवृध्द महिलेवर माकडाने अचानक हल्ला केला असून सदर महिला गंभीर जखमी झाली आहे. या घटनेने पाचगणीत महिला, लहान मुले व वृद्ध लोकाध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

पाचगणी, ( ता.महाबळेश्वर ) येथील हनुमान गल्लीत कृष्णाई पतसंस्थेच्या इमारतीमध्ये वरच्या मजल्यावर राहणाऱ्या श्रीमती शोभा बबन कांबळे वय ७५ वर्षीय महिला या दुपारी स्वयंपाक खोलीच्या गॅलरी मध्ये बसल्या होत्या. यावेळी अचानक एका माकडाने त्यांचे वर हल्ला चढवला. माकडाने त्यांचे डोक्यावर झेप घेतल्याने डोक्यात मोठी जखम झाली आहे.

## राहुल गांधींकडून ओबीसी समाजाचा अपमान

# भाजपाचे पिंपरीत निषेध आंदोलन

**पिंपरी :** काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांचा जन्म ओबीसीत झाला नसून गुजरात मधील तेली जातीत झालेला आहे, असा तिरपागडा आरोप करून संपूर्ण ओबीसी समाजाचा अपमान केला असल्याने भाजपच्यातर्फे शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली निषेध आंदोलन करण्यात आले.

भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा, पिंपरी चिंचवडच्यावतीने पिंपरी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात शुक्रवारी, ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.०० वा निषेध आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात मावळ लोकसभा संयोजक सदाशिव खाडे, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे, भाजपा वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष राजेंद्र राजापूरे, प्रदेश सहसंपर्क प्रमुख मनोज ब्राम्हणकर, दिव्यांग प्रकोष्ठ अध्यक्ष



शिवदास हांडे, कैलास सानप, सुरेश गादिया, सतिश नागरगोजे, दिशान मुखर्जी, दिनेश पाटे, गणेश ढाकणे, विजय शिनकर, सचिन बंदी, निरंजन राऊत, पंकज ठाकूर, विजय पंवार, दत्ता ढेगे, भरत आगणे, खंडूदेव कठारे, स्वाती देशमुख, संजना मराठे, अनघा रुद्रा यांच्यासह भारतीय जनता पार्टी, ओबीसी मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होते. प्रसंगी, राहूल गांधी यांच्या निषेधार्त घोषणा देण्यात आल्या.

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांचा जन्म ओबीसीत झाला नसून गुजरात मधील तेली जातीत झालेला आहे, गुजरातमध्ये सन २००० मध्ये ओबीसीत आणली असून मोदी यांचा जन्म सामान्य जातीत झाला. त्यांनी जातीनिहाय जनगणनेला (कास्ट सेन्सस) विरोध केला कारण त्यांचा जन्म ओबीसीत झालेला नसून सामान्य जातीत झालेला आहे, असे बेताल व निर्लज्ज उदगार काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी ओरिसातील सभेत काढले, राहुल यांचा हा उद्दामपणा म्हणजे समस्त ओबीसी समाजाचा अपमान आहे, असा आरोप प्रवक्ते राजू दुर्गे यांनी केला.

राहुल गांधी हे गांधी कुटुंबात जन्माला आले असून त्यांचा इटालियन कुटुंबाशी संबंध आहे. या लॉजिक प्रमाणे ते स्वत: भारतीय नागरिक ठरू शकत नाही. काँग्रेस नेहमीच ओबीसी आरक्षण विरोधात राहिली आहे. पंडीत नेहरू यांनी सन १९५३-५४ मध्ये काकासाहेब कालेलकर आयोगाने केलेल्या शिरफारशींचा विरोध केला होता. इंदिरा गांधी, राजीव गांधी यांनी मंडल आयोगाला विरोध केलेला आहे. इंदिरा गांधीनी मंडल आयोग रद्दीत टाकला होता, असेही ते म्हणाले.

मनोज ब्राम्हणकर म्हणाले की, राहुल गांधीच्या मते ओबीसी अंतर्गत अनेक जाती आरक्षणास पात्र नाहीत; कारण त्या सर्व पूर्वी सामान्य वर्गात होत्या. पुन्हा एकदा गांधी परिवार ओबीसी विरोधात षडयंत्र रचत आहे. एखाद्या जातीची ओबीसी विभागणी होण्यापूर्वी ज्या व्यक्तीचा अशा जातींमध्ये जन्म झाला त्यांचे आरक्षण राहुल गांधी काढून घेण्याच्या तयारीत आहे. काँग्रेस तेली समाजाला ओबीसी पासून वेगळे करण्याचा आणि ओबीसींचा एक वर्ग कमकुवत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. इतके वर्ष धर्म आणि जातीवरून फूट पडून ते आता ओबीसीमध्ये सुध्दा फूट पाडत आहेत.



# लोहगाव विमानतळाच्या विस्तारीकरणाला मिळणार गती

## अजित पवार आणि विमानतळ प्राधिकरण यांच्या बैठकीत ठरले निधी आणि जमीन संपादनाचे सूत्र

**पुणे:** पुरंदरच्या बहुप्रतिक्षित विमानतळाचे घोंगडे दीर्घकाळ भिजत पडले असतानाच लोहगाव विमानतळाच्या विस्तारीकरणाबाबत दोन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामुळे या कामाला गती मिळणार असल्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पुणे शहराला मोठी गरज असतानाही लोहगाव विमानतळ अपुरे पडत असल्याने विमानतळ प्राधिकरणाने या विमानतळावर एक अतिरिक्त टर्मिनल उभारले आहे. या टर्मिनल चे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होणार आहे. त्याच्या पूर्वतयारीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विमानतळ प्राधिकरणासोबत एका बैठकीचे आयोजन केले. या बैठकीमध्ये लोहगाव विमानतळाच्या विस्तारीकरणाचे निर्णय घेण्यात आले.

विमानतळाचा विस्तार करण्यासाठी १३७ एकर जमीन संपादित करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. यासाठी लागणाऱ्या निधीपैकी ६० टक्के निधी राज्य सरकारकडून प्राप्त होणार आहेत तर उर्वरित ४० टक्के निधीची पूर्तता पुणे महानगरपालिका, पिंपरी महानगरपालिका आणि पुणे महानगर विकास प्राधिकरण यांच्याकडून केली जाणार आहे.

लोहगाव विमानतळावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची गरज ओळखून विमानतळ प्राधिकरणाने अतिरिक्त टर्मिनल बांधले आहे. त्याचा विस्तार तब्बल पाच लाख चौरस फुटांचा असून त्यावर अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिले आहेत. सध्या या विमानतळावरून प्रतिदिन ९० विमाने उड्डाण घेतात अतिरिक्त टर्मिनलमुळे ही संख्या १२० पर्यंत पोहोचणार आहे. अर्थातच प्रवाशांची संख्या दरवर्षी एक कोटी पेक्षा अधिक पर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.

# केंद्राच्या धोरणांच्या निषेधार्थ १६ रोजी औद्योगिक संप

## संयुक्त किसान मोर्चा : ग्रामीण बंदही

**सांगली :** 'केंद्र सरकारच्या कामगार-शेतकरीविरोधी आणि देशविघातक धोरणांच्या निषेधार्थ औद्योगिक संप आणि ग्रामीण बंद जिल्हाभर यशस्वी करा,' असे आवाहन संयुक्त किसान मोर्चा (एसकेएम) आणि केंद्रीय ट्रेड युनियन्स (सीटीयु) यांनी केले आहे.

सांगली जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात, तसेच शहरात 'रास्ता रोको', निदर्शने करण्याचे आवाहन आज 'कष्टकऱ्यांची दौलत' येथे झालेल्या बैठकीत करण्यात आले. बैठकीस उमेश देशमुख, अरुण माने, रेहाना शेख, विजय बचाटे, रियाज जमादार, इब्राहीम पेंढारी, अशोक नाईक आदी उपस्थित होते.

'महाराष्ट्रातील परिस्थितीही अत्यंत भीषण बनली आहे. सत्ताधारी भाजपने कुटिल कारस्थान रचून व शासकीय यंत्रणांचा गैरवापर करून राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार पाडले. शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पाडली. अनेक नेत्यांना तुरुंगात टाकून व 'ईडी'सारख्या यंत्रणांचा गैरवापर करून विरोधी आवाज दडपून टाकण्याचे प्रयत्न केले. भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या संपूर्ण प्रक्रियेत राज्यात बदनाम होऊन जनतेच्या मनातून उतरला आहे. आर्थिक आघाडीवरही सत्ताधाऱ्यांना जनतेला दिलासा देण्यात संपूर्णपणे अपयश आले आहे. जनतेत सत्ताधाऱ्यांच्या विरोधात यामुळे मोठा असंतोष वाढतो आहे,' अशी टीका या वेळी करण्यात आली.

# सिध्देश्वर मारटकर आणि डॉ. चंद्रकला जोशी यांना मंदाश्री पुरस्कार प्रदान

## ज्योतिषी कलाकार, खेळाडूसारखा असतो : सिध्देश्वर मारटकर

**पुणे :** पं.दादासाहेब जकातदार प्रतिष्ठानतर्फे पं. श्रीकृष्ण जकातदार यांच्या २५ व्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात ज्योतिषी सिध्देश्वर मारटकर आणि लेखिका डॉ. चंद्रकला जोशी यांना 'मंदाश्री' पुरस्कार डॉ.वा.ल.मंजुळ यांच्याहस्ते देण्यात आला. साहित्य परिषदेत नुकताच हा कार्यक्रम पार पडला.ज्येष्ठ लेखक,ज्येष्ठ पत्रकार अरविंद गोखले, प्रतिभा मोडक, चंद्रकांत शेवाळे, दादासाहेब जकातदार, विजय जकातदार, नंदकिशोर जकातदार उपस्थित होते. पल्लवी जकातदार यांनी सूत्रसंचालन केले.

२००१ साली मिळालेला प्रतिष्ठेचा शाहू मोडक स्मृती पुरस्कार चांगले काम करावे यासाठी मिळाला होता तर



**मंदाश्री ' पुरस्कार वितरण प्रसंगी डावीकडून नंदकिशोर जकातदार ,संजीवनी मारटकर, सिद्धेश्वर मारटकर, अरविंद गोखले आणि विजय जकातदार.**

आजचा प्रतिष्ठेचा मंदाश्री पुरस्कार चांगले काम केले म्हणून मिळाला असे समजतो.या पुरस्कारासाठी माझ्यावर आपण जो विश्वास व्यक्त केला त्याबद्दल जकातदार परिवार व प्रतिष्ठानचे विश्वस्त यांचेप्रति आभार व्यक्त करतो.आजवर मिळालेल्या यशामागे कठीण प्रसंगी माझ्यामागे खंबीर पणे उभ्या राहणाऱ्या प्रतिभाताई मोडक व विजय जकातदार , वा.ल.मंजूळ यांचे या प्रसंगी आभार व्यक्त करतो

**ज्योतिषाची भूमिका खेळाडूसारखीच : सिध्देश्वर मारटकर**

**सत्काराला उत्तर देताना मारटकर यांनी सांगितले की ज्या प्रमाणे मोठ्या कलाकाराचे प्रत्येक चित्रपट यशस्वी होत नाही किंवा मोठा खेळाडू प्रत्येक सामना जिंकू शकत नाही त्याप्रमाणे कोणत्याही ज्योतिर्विदांचे प्रत्येक भाकीत अचूक ठरत नाही त्यांनाही मर्यादा असून ज्योतिषी म्हणजे ब्रह्मदेव नाही ही वस्तुस्थिती समाजानी व ज्योतिर्विदानी सुद्धा स्वीकारायला हवी.**

**जास्तीत जास्त अचूक भाकिते वर्तविण्यासाठी ज्योतिष एक साधना समजून अभ्यास करणे गरजेचे आहे.**

# शिक्षणमहर्षी बाबुरावजी घोलप यांनी शिक्षण प्रसारासाठी मोलाचे योगदान दिले : सुरेश घुले

## अण्णासाहेब मगर महाविद्यालयात शिक्षणमहर्षी बाबुरावजी घोलप यांना अभिवादन



**हडपसर :** अण्णासाहेब मगर महाविद्यालयात पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे संस्थापक शिक्षणमहर्षी बाबुरावजी घोलप यांच्या जयंतीनिमित्त पुणे जिल्हा सहकारी बँकेचे संचालक व महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष सुरेश घुले यांच्या हस्ते शिक्षणमहर्षी कै. बाबुरावजी घोलप यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. नितीन घोरपडे, डॉ. अमित देवकुळे उपस्थित होते.

शिक्षण महर्षी बाबुरावजी घोलप यांनी पुणे जिल्ह्यातील दुर्गम भागात शिक्षणाची गंगा पोहचवली. त्यांनी स्वतः गावोगावी बैलगाडीने, सायकलवरून आणि प्रसंगी पायी प्रवास करून तळागाळातील लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन शिक्षण प्रसाराचे मोलाचे काम केले. शिक्षण क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान आहे असे प्रतिपादन पुणे जिल्हा सहकारी बँकेचे संचालक व महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष सुरेश घुले यांनी केले.

बाबुरावजी घोलप यांनी बहुजन समाजातील मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी ७ सप्टेंबर, १९४१ रोजी 'पुणे जिल्हा शिक्षण मंडळा'ची स्थापना केली. भोर तालुक्यातील नसरापूर येथे शिवाजी विद्यालय ही पहिली शाळा सुरू केली. त्यांनी सुरू केलेल्या या संस्थेचा आज मोठा विस्तार झाला आहे. असे मत प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शुभांगी औटी, डॉ. प्रशांत मुळे, डॉ. प्रवीण ससाणे, डॉ. नाना झगडे, डॉ.राजेश रसाळ, डॉ. अशोक ससाणे, डॉ. शुभांगी शिंदे, प्रा. नितीन लगड, पवन कर्डक आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नितीन लगड यांनी केले तर आभार डॉ. शुभांगी औटी यांनी मानले.





# भोर तहसील कार्यालयासमोर राहुल गांधी यांचा भाजपा युवा मोर्चाच्या वतीने जाहीर निषेध

**भोर :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्याविषयी जातीवाचक विधान करून देशातील संपूर्ण ओबीसी व इतर समाजाच्या भावना दुखावण्याचा प्रयत्न केल्याबद्दल भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्षा अंकितातार्इ पाटील ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली भोर तालुका भाजपा युवा मोर्चाचे अध्यक्ष अमर बुदगुडे यांच्या वतीने भोरचे तहसीलदार सचिन पाटील यांना शुक्रवार (दि.९) रोजी निवेदन देऊन कार्यालयाच्या बाहेर निषेध आंदोलन केले.

यावेळी पुणे जिल्हा युवा मोर्चाचे सरचिटणीस वैभवजी सोलनकर, तालुका अध्यक्ष जीवन आप्पा कोंडे, शहर अध्यक्ष सचिन कण्हेरकर, जिल्हा युवा मोर्चा उपाध्यक्षअभिजित कोंडे, जिल्हा सचिव प्रमोद साबळे,महिला अध्यक्षा आशा शिवतरे, उपाध्यक्ष राजाभाऊ गुरव , पल्लवी फडणीस, स्वाती गांधी, संतोष लोहोकरे, पंकज खुर्द, दीपक तनपुरे, दीपक मालुसरे ,समीर घोडेकर, समीर बांदल ,सचिन म्हस्के, रोहन भोसले ,केदार साळुंखे, निलेश चव्हाण, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राहुल गांधी हे वारंवार समाजामध्ये तेढ निर्माण होईल अशी वक्तव्य करत असतात मोदींचा जगभरात असलेला करिश्मा पचनी पडत नाही अशी टीका भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष अमर बुदगुडे यांनी यावेळी केली.

# नारायणगांव महाविद्यालयाच्यावतीने बँकॉक येथे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**नारायणगाव :** ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नारायणगाव, पिंपरी चिंचवड पुणे येथील ग्लोबल रीसर्च कॉन्फरन्स फोरम आणि फरानाखोन राजाभट युनिव्हर्सिटी बँकॉक, थायलंड यांच्या संयुक्त विद्यमाने बँकॉक येथे नुकतीच आंतरराष्ट्रीय शैक्षणिक परिषद घेण्यात आली. या आंतरराष्ट्रीय परिषदेस उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सस्टेनेबल बिझनेस ग्रोथ, चॅलेंजेस, मेझर्स न्ड सोल्यूशन्स इन ग्लोबल सिनेरिओ या विषयीच्या परिषदेत जगभरातील १३५ प्राध्यापक, उद्योजक, संशोधक व विद्यार्थी सहभागी झाले होते.

यावेळी थायलंडच्या पंतप्रधानांचे सल्लागार पिचाइ नरिप्थाफन, फरानाखोन राजाभट विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रियांग कित्रातपोर्न, अमेरिकेतील ग्लोबल लीडर ल्युमिएरचे मुख्य कार्यकारी अधिकारी स्मायली मुक्ता घोषाल, केरळ केंद्रीय विद्यापीठाचे डॉ.जे.गणेशकुमार, फरानाखोन विद्यापीठाचे उपाध्यक्ष डॉ. सुब्तारकुल सुचत, राजापार्क इन्स्टिट्यूटचे कुलगुरू डॉ. वांथन्नापोल हिरुंबुराना, अरूणाचल प्रदेश मधील हिमालया विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रकाश दिवाकरन, फरानाखोन विद्यापीठाचे डॉ. अरुण चायनीत, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राध्यापक व वाणिज्य व व्यवस्थापन विषयाचे वरिष्ठ संशोधक प्रा.डॉ. जे.पी.भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष मा.कृषीरत्न अनिल मेहेर व प्राचार्य डॉ.ए.बी. कुलकर्णी यांनी उपस्थितांना ऑनलाईन मार्गदर्शन केले. यावेळी पिंपरीतील डॉ. डी.वाय.पाटील इंजिनिअरिंग कॉलेजचे डॉ.डी.बी.भालके, डॉ. नितीन शेरजे, अनंतराव थोपटे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रसन्न देशमुख, सचिन पवार, हर्षा भोसले, रेशमा पठाण, सिद्धी आर्वीकर व इतर ७० प्राध्यापकांनी शोधनिबंध सादर केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रकाश दिवाकरन यांनी केले. सूत्रसंचालन व आभार डॉ.जे.पी भोसले यांनी मानले.





# अमित शहा व ना.रामदास आठवले यांची भेट

केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांची आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रिय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी भेट घेतली. आगामी लोकसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला जागा सोडण्याबाबत उभयनेत्यांमध्ये चर्चा झाली. रिपब्लिकन पक्षाला शिर्डीची जागा सोडली पाहिजे अशी संबंध महाराष्ट्रातून रिपब्लिकन जनतेची मागणी असून रिपब्लिकन पक्षाला किमान दोन जागा महायुतीत सोडल्या पाहिजेत असा जनतेचा दबाव आहे. शिर्डीची जागा केंद्रियराज्यमंत्री ना.रामदास आठवले यांना सोडण्याबाबत जनतेची जोरदार मागणी असल्याची माहिती केंद्रियगृहमंत्री अमित शहा यांच्या पर्यंत चर्चा पोहोचल्याने त्यावर ही यावेळी चर्चा झाली. लोकसभा निवडणुकीत शिर्डीची जागा रिपब्लिकन पक्षाला सुटू शकते अशी रिपब्लिकन पक्षाची आशा या भेटीच्या बातमीमुळे पल्लवित झाली आहे.

# मालोजीराजे विद्यालयाचे एन.एम.एम.एस. परीक्षेमध्ये घवघवीत यश

**लोणंद :** मालोजीराजे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, लोणंद ता. खंडाळा जि. सातारा विद्यालयातील एन.एम.एम.एस. परीक्षेसाठी प्रविष्ट झालेल्या एकूण ५५ विद्यार्थ्यांपैकी २६ विद्यार्थी चांगल्या गुणांनी पात्र झाले असून सारथी शिष्यवृत्तीसाठी ०५ विद्यार्थी पात्र झाले आहेत.

१०० पेक्षा जास्त गुण मिळवणारे विद्यार्थी ०७, बोडके प्रणित गिरीश १३०, जाधव श्रेयस कुलदीप ११९, कोळेकर आदित्य दशरथ ११४, शेळके प्रज्वल दत्तात्रय ११३, गुरव आदित्य शरद १११, बनसोडे वेदांत माणिक ११०, आत्तार आमीन शब्बीर १०८, श्री. मिलिंद (दादा) माने, श्री. आनंदराव (मामा) शेळके, डॉ. अजितकुमार वर्धमाने, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पदाधिकारी तसेच कॉलेजचे प्राचार्य श्री.चंद्रकांतजी जाधव साहेब , उपप्राचार्य आबाजी धायगुडे व विद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# गुन्हेगारीला आळा बसविण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची नागणी

**भाजप पक्षाचे सरचिटणीस शक्तीसिंग कल्याणी दिले मनपा आयुक्त व पोलीसांना दिले निवेदन**



**हडपसर :** सध्या रामटेकडी झोपडपट्टीत गुन्हेगारीने डोके वर काढल्याने गुन्हेगारीला आळा बसविण्यासाठी रामटेकडीतील मुख्य रस्त्यावर, चौकात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावी यासाठी

भारतीय जनता पार्टीचे हडपसर विधानसभा मतदारसंघाचे सरचिटणीस शक्तीसिंग कल्याणी यांच्या नेतृत्वाखाली पोलीस आयुक्त पुणे शहर , आयुक्त महानगरपालिका पुणे, श्रीनिवास कन्दुल उपायुक्त विद्युत विभाग महानगरपालिका पुणे, तसेच वानवडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पतंगे यांना रामटेकडी परिसरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी लेखी निवेदन देण्यात आले.

रामटेकडी झोपडपट्टी भागामध्ये दैनंदिन वाढत असलेली गुन्हेगारीला आळ्या घालण्यासाठी रामटेकडी परिसरामध्ये वाढता गुंडाचा हौदोष थांबवण्यासाठी आणि गोरगरिब जनतेच्या रक्षण करण्यासाठी परिसरातील विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याकरिता निवेदन देण्यात आले रामटेकडी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी ११ ठिकाण सुचवण्यात आले. अण्णाभाऊ साठे उद्यान समोर, आनंदनगर, रामनगर राम मंदिर, हनुमान मंदिर अंधशाळा समोर, विठ्ठल मंदिर समोर, वंदे मातरम चौक, साईबाबा मंदिर जवळ एस आर पी रोड चौक, मनपा शाळा समोरील चौक, पंचशील बुद्धविहार समोरील चौक, प्रथमा सोसायटी समोरील चौक, रामटेकडी हिंदू स्मशानभूमीकडे जाणाऱ्या चौक, या ठिकाणी वाढती गुन्हेगारी आणि गुंडांचा वाढता हौदोष अशा अनेक घटना या परिसरात गुंडांच्या माध्यमातून घडत आहेत. या गुंडांना सीसीटीव्ही कॅमेरे मुळे वाढणाऱ्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी लवकरात लवकर या परिसरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची मागणी करण्यात आली.

# रोटरी क्लब लोणंद आयोजित मोफत नेत्र तपासणी व मोफत चष्मे वाटप

**लोणंद :** रोटरी क्लब लोणंद आयोजित, दृष्टी प्रोजेक्ट अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांची मोफत नेत्र तपासणी व मोफत चष्मे वाटप. कार्यक्रमांमध्ये मालोजीराजे विद्यालय, लोणंद, न्यू इंग्लिश स्कूल मुलींचे, लोणंद येथील सुमारे २५०० विद्यार्थी, विद्यार्थिनींची मोफत संगणकाद्वारे तपासणी करण्यात आली. यातील सुमारे ९८ विद्यार्थ्यांना त्याच्या डोळ्यांमध्ये दोष आढळून आले, त्यापैकी ५६ विद्यार्थ्यांच्या डोळ्यांचे नंबर काढून त्यांना मोफत चांगल्या क्वालिटीचे चष्मे देण्यात आले.

प्रोजेक्टसाठी सहाय्यक प्रांतपाल रोटरीन सलीम मुजावर व रोटरीन प्रवीण चांदवडकर यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमास रोटरीचे

# बेकायदा वृक्षतोड आणि कोळसा चालकांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश

**संबंधित वन अधिकारी यांच्यावरही कारवाईचे संकेत**

**पुणे विभागाचे वरिष्ठ वनअधिकारी दीपक पवार यांनी केली पाहणी**

**पाटस :** दौंडच्या पूर्व भागातील मलठण, राजेगाव , वाटलुज नायगाव या भागातील वनक्षेत्रातील बेकायदा वृक्षतोड आणि कोळसा खाणी चालक आणि मालक यांच्यावर गंभीर गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याचे आदेश विभागाचे सहाय्यक उपवनसंरक्षक अधिकारी दीपक पवार यांनी दिले आहेत.

त्यांनी बुधवारी घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्षात पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित वन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना तीव्र नाराजी व्यक्त करीत धारेवर धरुन त्यांच्यावर ठोस कारवाई करण्याचे संकेत दिले. मागील अनेक दिवसांपासून तालुक्यातील पुर्व भागातील मलठण, राजेगाव, वाटलुज, नायगाव या भागातील वनक्षेत्रातील वनजमीनीत बेकायदा वृक्षतोड करून कोळसा खाणी सुरू होत्या. या व्यवसायात या भागातील काही राजकीय मंडळींचा समावेश असल्याने खुलेआम बेकायदा वृक्षतोड व कोळसा खाणी या वनविभागाचे स्थानिक वनअधिकारी आणि कर्मचारी यांच्या संगनमताने सुरू होत्या. याबाबत मलठण ग्रामस्थांनी काही दिवसांपूर्वी दौंड तालुका वनपरिक्षेत्र अधिकारी कल्याणी गोडसे यांच्याकडे लेखी



तक्रार ही केली होती. मात्र संबंधित वृक्षतोड आणि कोळसा भट्ट्या मालक व चालकांवर कोणत्याही प्रकारची कारवाई केली गेली नाही.उलट त्यांना फरार होण्यास मदत केली. परिणामी संबंधित आरोपी हे राजरोसपणे फिरत आहेत. स्थानिक वन अधिकारी आणि कर्मचारी या प्रकाराला पाठीशी घालत असल्याचा आरोप मलठण ग्रामस्थांनी केला होता. संबंधित बेकायदा वृक्षतोड आणि कोळसा भट्ट्या मालकांवर तसेच या व्यवसायिकांना पाठीशी घालणाऱ्या तालुका वनपरिक्षत्र अधिकारी आणि स्थानिक वनपाल , वनसंरक्षक व वनकर्मचारी यांच्या वर गुन्हे दाखल करून ठोस अशी कारवाई करावी अशी मागणी मलठण ग्रामस्थांनी पुणे विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक दिपक पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. याची त्वरित दखल घेत पुणे विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक दिपक पवार यांनी बुधवारी (दि ७) तालुक्यातील मलठण, राजेगाव, वाटलुज, नायगाव या भागातील वनक्षेत्राताला घटनास्थळी भेट देऊन प्रत्यक्षात पाहणी केली. यावेळी वाटलुज, नायगाव, राजेगाव, मलठण या भागातील वनक्षेत्रातील वनजमीनीत मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आल्याचे निदर्शनास आले. तब्बल ७ हेक्टर च्या आसपास वनक्षेत्रांमध्ये बेकायदा वृक्षतोड करण्यात आल्याचे ही निदर्शनास आले. या बेकायदा वृक्षतोडीमुळे वनक्षेत्राचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे दिसून आले. तर वाटलुज ,नायगाव, राजेगाव या परिसरात बेकायदा कोळसा खाणी सुरू असल्याचे यावेळी पाहणी दरम्यान दिसुन आले तर काही ठिकाणी वनक्षेत्रात बेकायदा माती उत्खनन केले असल्याचे ही आढळून आले. यावेळी पवार यांनी स्थानिक वन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना जाब विचारत ग्रामस्थांसमोर धारेवर धरले. याप्रसंगी ग्रामस्थांनी तालुक्यातील वन अधिकारी आणि कर्मचारी यांच्या संगनमताने हा सर्व प्रकार खुलेआम सुरू असल्याची माहिती वरिष्ठ वनअधिकारी दीपक पवार यांना दिली. हा सर्व प्रकार सुरू असताना ग्रामस्थांनी वेळोवेळी स्थानिक वन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना तोंडी आणि लेखी कळवले मात्र त्यांच्याकडून उडवाउडवीची उत्तरे मिळाली. संबंधित वृक्षतोड आणि कोळसा भट्ट्या मालकांवर अद्याप पर्यंत तालुका वन अधिकारी यांनी कारवाई करण्याचे टाळाटाळ केली आहे असुन संबंधितांना पाठीशी घातले जाते अशी माहिती यावेळी दिली. स्थानिक वन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याची मागणी ही ग्रामस्थांनी पवार यांच्याकडे यावेळी केली. यावेळी ग्रामस्थानी वनक्षेत्रांमध्ये कशाप्रकारे बेकायदा वृक्षतोड कशा पद्धतीने केली आहे निदर्शनास आणून दिले. घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी दीपक पवार यांनी स्थानिक वन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना धारेवर धरले हा सर्व प्रकार होत असताना तुम्ही का रोखले नाही? संबधित व्यक्तींवर गुन्हे दाखल करून कारवाई का केली नाही? यावेळी पवार यांनी तीव्र नाराजी व्यक्त करीत घटनास्थळी त्वरित पंचनामा करून बेकायदा वृक्षतोड आणि कोळसा भट्ट्या मालकांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले. तसेच यासंदर्भात वन अधिकारी आणि कर्मचारी यांची ही सखोल चौकशी करून दोषी वन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर ठोस अशी कारवाई केली जाईल असे आश्वासन ग्रामस्थांना दिले.मलठण ग्रामपंचायत चे उपसरपंच गोरख कोपनर, ग्रामपंचायत सदस्य अभिजित चौधरी, संकेत दळवी, माजी सरपंच नवनाथ थोरात, शेतकरी पिरानी देवकाते, लतिफ काळे, लालासो देवकाते,गोरख वाघमोडे, अमर परदेशी, पाटबंधारे विभागाचे कर्मचारी आनंता शिंदे, दौंड वनपरिक्षत्र अधिकारी कल्याणी गोडसे यांच्यासह वन अधिकारी आणि कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# मावळ तालुक्यात शासन आपल्या दारी मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद

## चार दिवसात ६ हजार ६०० नागरिकांनी घेतला लाभ





वडगाव मावळ: मावळचे आमदार सुनील शेळके यांच्या संकल्पनेतून तालुक्यात मागील चार दिवसांपासून शासन आपल्या दारी मोहीम राबवली जात आहे. शासनाच्या सर्व योजना एकाच छताखाली आल्याने या मोहिमेला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.चार दिवसात ६ हजार ६०६ लाभार्थ्यांनी लाभ घेतला आहे. तालुक्यातील १५ गावे दररोज या मोहिमेत सहभागी होत आहेत. त्यामुळे नागरिकांना याचा चांगला फायदा होत आहे.रेशन कार्ड,आधार कार्ड आणि मतदान कार्डशी संबंधित सर्वाधिक कामे केली जात आहेत.

मावळचे आमदार सुनील शेळके हे गेल्या चार दिवसापासून शासन आपल्या दारी हा कार्यक्रम करत आहेत या मोहिमेमुळे लोकांना एकाच छताखाली सर्व शासकीय कागद- पत्रांचा लाभ घेता आला पाहिजे असा उद्देश आहे. स्थानिक लोकांना शासनाच्या योजनांची माहिती मिळावी तसेच योग्य योजनेचा लाभ घेता यावा याकरिता शासन आपल्या दारी

### शासन आपल्या दारी योजनेचे उद्दिष्ट

**शासन आपल्या दारी' या योजनेचा मुख्य उद्देश सरकारी सेवा आणि लाभ घेताना नागरिकांना येणाऱ्या अडचणीचे निवारण करणे आहे. बऱ्याचदा,एखाद्या व्यक्तीला जर सरकारी योजनेसाठी अर्ज करायचा असेल तर बऱ्याच प्रक्रियांमधून जावे लागते,अनेक कार्यालयांना भेट द्यावी लागते त्याचप्रमाणे विविध कागदपत्रे साधार करावे लागतात आणि या सर्व प्रक्रियेमध्ये बराच कालावधी जातो. सामान्य व्यक्तीच्या या सर्व अडचणींचे निवारण करण्यासाठीच शासन आपल्या दारी हा उपक्रम आमदार सुनील शेळके यांनी राबवला आहे.**

| विभागाचे नाव | लाभार्थी संख्या |
|---|---|
| १) रेशन कार्ड - | ११७१ |
| २) संजय गांधी योजना - | १४१ |
| ३) पंतप्रधान किसान योजना - | ६४२ |
| ४) आयुष्यमान भारत योजना- | ४११ |
| ५) घरकुल योजना - | ३८४ |
| ६) लेक लाडकी योजना - | १३८ |
| ७) भूमी अभिलेख - | २३२ |
| ८) पशु संवर्धन - | २६२स |
| ९) आरोग्य विभाग- | २७२ |
| १०)जातीचे दाखले - | ६०४ |
| ११) मतदार नोंदणी - | ७१७ |
| १२) आधार कार्ड - | १६३२ |

**एकूण ६६०६ लाभार्थींनी चार दिवसात लाभ घेतला.**

हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.मावळ तालुक्यातील रोज पंधरा गावे या उपक्रमात भाग घेत आहेतअशाप्रकारे मागील ४ दिवसात तालुक्यातील रेशनकार्ड विभागात सातशे पेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाले असून शंभर पेक्षा अधिक नागरिकांना नवीन रेशनकार्ड आतापर्यंत वाटप करण्यात आले आहे.तसेच तालुक्यातील आतापर्यंत दहा ते बारा हजार लाभार्थ्यांनी या अभियानास भेट दिली आहे.

शासन आपल्या दारी या लोकोपयोगी अभियाना दरम्यान मावळचे आमदार गेल्या चार दिवसांपासून भेगडे लॉन्स येथे ठिय्या मांडून बसले आहेत. गुरुवारी नवीन रेशनींगकार्ड काढलेल्या नागरिकांना आमदार सुनील शेळके यांच्या हस्ते रेशनिंग कार्डचे वाटप करण्यात आले. नागरी समस्या सोडविण्यासाठी अधिका-यांना चांगलीच तंबी देऊन लोकांची कामे करून घेतली जात आहेत. लोकांचीही कामे झाल्याने त्यांच्या चेह-यावरचे समाधान पाहून आमदारांना देखील कृतकृत्य झाल्याचे पहायला मिळतेय.